सुधारित बीज भांडवल योजना

महाराष्ट्र शासन
उद्योग, उर्जा व कामगार विभाग
शासन निर्णयक्र. इपीपी १०९२/१३१९१/[६३५६]/उद्योग-१८,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दि. ३० सप्टेंबर, १९९३

पहा

१] शासन निर्णय, उद्योग, उर्जा व कामगार विभाग क्र.एसएसआय ४०७४/४१२६४/उद्योग-२ दि. १९ फेब्रुवारी, १९७५
२] शासन निर्णय, उद्योग, उर्जा व कामगार विभाग क्र.इपीपी १०७५/६१६ /उद्योग-१३ दि. ३ मे, १९७६
३] शासन निर्णय, उद्योग, उर्जा व कामगार विभाग क्र. इपीपी १३७८/३६८५/उद्योग-१३ दि. ३१ जुलै, १९७८
४] शासन निर्णय, उद्योग, उर्जा व कामगार विभाग क्र. इपीपी १०९२/६३९४/उद्योग-१८ दि. १९ आगस्ट १९९२

प्रस्तावना

शासनाची सुशिक्षित बेरोजगारांस बीज भांडवल सहाय्याची योजना १९७६-७७ पासुन उद्योग संचालनालय व प्रादेशिक विकास महामंडळ यांच्या मार्फत राबविण्यात येत आहे. दरम्यानच्या काळात सन १९८३ पासुन केंद्र शासनाच्या व बँकांच्या उद्योजकांसाठी वित्तीय सहाय्याच्या विविध लक्षगटांकरिता ठळक वैशिष्ठ्यांमधील थोड्याफार फरकांच्या अनेक योजना राबविण्यात येत आहेत. तथापि, या सर्व योजनांचा एकत्रित विचार केला असता बेरोजगारांचा काही लक्षगट वित्तीय सहाय्याच्या योजनांपासून वंचित रहात असल्याचे शासनाच्या निदर्शनास आलेले आहे.आठव्या पंचवार्षिक योजनेचे रोजगार निर्मितीची संधी व रोजगार निर्मितीचे महत्वाचे उद्दिष्ट लक्षात घेता राज्यात मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मितीची संधी उपलब्ध करुन देण्याच्या हेतूने या सर्व योजनांमधुन वंचित असलेल्या बेरोजगारांच्या लक्षगटास शासनाच्या सहाय्यकारी योजनेमध्ये समाविष्ट करण्याबाबत शासन विचाराधीन होते. महाराष्ट्राचे नवे औद्योगिक धोरण १९९३ नुसार बीजभांडवल सहाय्य योजनेची केंद्र शासनाच्या राष्ट्रीय समभाग निधी योजनेशी सांगड घालून आणि पुनसंरेखन करुन सदरहू योजनेच्या अंमलबजावणीचे काम जिल्हा उद्योग केंद्राकडे सोपविण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे.

केंद्र शासनाच्या व बँकांच्या विविध योजनांचा परिपूर्ण लाभ घेणा-या बेरोजगारांपैकी उर्वरित बेरोजगारांसाठी स्वयंरोजगार/रोजगार उपलब्ध व्हावा यादृष्टीने बीजभांडवल सहाय्य योजनेमध्ये सुसूत्रीकरण करुन सुधारणा करण्यात येत आहे.

शासन निर्णय

सुशिक्षित बेरोजगारांना बीजभांडवल सहाय्य देण्याच्या महाराष्ट्र शासनाच्या योजनेची खाली नमूद केलेली सुधारित योजना विहित करण्यात येत आहे.

१.२ योजनेचे नावः- ‘‘बीजभांडवल योजना’’

१.३ योजनेचा उद्देशः- १९७२-७३ साली केंद्र शासनाने सुशिक्षित बेरोजगारांना लघु उद्योग, सेवा उद्योग, किंवा इतर विविध प्रकारच्या धंद्यामधून स्वयंरोजगारासाठी प्रवृत्त करण्याच्या दृष्टीने सहाय्य करणे हा उद्देश ठेवून पूर्वीची योजना तयार केली होती. हा उद्देश अधिक परिणामकारकरित्या अंमलात आणण्यासाठी योजनेच्या काही ठळक वैशिष्ठ्यांमध्ये सुसूत्रीकरणाच्या दृष्टीने फेरबदल करण्यात आलेले असून सुधारित योजना अधिक व्यापक करण्यात येत आहे.

१.४ अंमलबजावणी करणारी यंत्रणाः- उद्योग संचालनालय व त्यांच्या अधिपत्याखाली येणारी जिल्हा उद्योग केंद्र, मुंबई आणि मुंबई उपनगर जिल्ह्यांसाठी उद्योग सह संचालक, मुंबई प्राधिकरण विभाग, मुंबई

१.५ लाभार्थीची पात्रताः- १८ ते ५० वर्ष वयोगटातील किमान इयत्ता ७ वी पास अशा स्थानिक व्यक्ती किंवा

१.५.१ कायदेशीर तरतूदींप्रमाणे एकत्र आलेल्या अशा व्यक्तीचा समुह परिच्छेद १.५.३ मधील तरतूदींच्या अधीन राहून, या योजनेचा लाभ मिळण्यास पात्र राहतील. तथापि, अर्जदाराच्या अंगभूत अशा विशेष कला व कौशल्याच्या आधारावर शैक्षणिक पात्रता शिथिल करण्याचे अधिकार उद्योग संचालनालयाच्या प्रादेशिक अधिका-यांना प्रदानित करण्यात येत आहेत.

१.५.२ अर्जदारापैकी एखादी व्यक्ती आधीच नोकरी करीत असेल तर अशा व्यक्तीने या योजने अंतर्गत कर्ज मंजूर झाल्यानंतर कर्ज वितरित होण्यापूर्वी नोकरीतून राजीनामा देणे आवश्यक आहे. तथापि अर्ज करताना नोकरीतून राजीनामा देण्याचे हमीपत्र देणे आवश्यक राहील.

१.५.३ भागीदारीतील संस्था, खाजगी मर्यादित कंपनी आणि सहकारी संस्थांच्या उत्पादक घटकांमधील बीजभांडवल योजनेचा लाभ घेण्यास पात्र व्यक्ती बहुसंख्येने असून सक्रिय असतील आणि प्रकल्पातील त्यांचे समभाग भांडवल किमान ७६ टक्के असेल तर असे उद्योग घटक बीजभांडवल योजनेचा लाभ घेण्यास पात्र ठरतील.

१.६ योजनेचे व्याप्तीक्षेत्र (कव्हरेज):- बीजभांडवल सहाय्य देय असलेल्या उद्योग/व्यवसायांची यादी सोबतच्या परिशिष्ट-१ मध्ये दिलेली आहे.

१.७ बीजभांडवल सहाय्याचा आकृतीबंधः-

१.७.१ बीजभांडवल कर्जाचे प्रमाण बँका/ वित्तीय संस्थांनी मंजूर केलेल्या प्रकल्प खर्चाच्या १५% राहील. तथापि रु.१.०० लाखपेक्षा कमी प्रकल्प खर्च असलेल्या प्रकरणांमध्ये बीजभांडवल कर्जाचे प्रमाण पुढीलप्रमाणे राहील.

१. सर्वसाधारण प्रवर्गातील लाभधारकांसाठी आर्थिक दुर्बल घटकांतर्गत मोडत असल्यास ]
आणि ] २०%
मागासवर्गीय लाभधारकांसाठी आर्थिक दुर्बल घटकांतर्गत मोडत नसल्यास ]

२. मागासवर्गीय लाभधारकांसाठी आर्थिक दुर्बल घटकांतर्गत मोडत असल्यास २२ १/२%

१.७.२ बीजभांडवलाची कमाल मर्यादा रु. १.५ लाख एवढी राहील

१.८ <u>प्रकल्पाची किंमतः</u>- या योजनेमध्ये पात्र उद्योग / व्यवसायाच्या प्रकल्प खर्चाची कमाल मर्यादा रु. १० लाख राहील. उद्योग घटकाच्या प्रकल्प खर्चामध्ये एकूण स्थिर भांडवली गुंतवणूक व खेळत्या भांडवलाचे सिमांतिक भांडवल अंतर्भूत राहील.

१.९ <u>बीजभांडवल सहाय्यावर आकारावयाचे व्याजः-</u>

१.९.१ बीजभांडवलाची रक्कम मृदू कर्ज (सॉफ्ट लोन) म्हणून दरसाल १०% व्याजाने देण्यात येईल.

१.९.२ लाभार्थीची परतफेड केलेली रक्कम प्रथम व्याजापोटी जमा करुन उर्वरित रक्कम मुद्दलापोटी जमा केली जावी.

१.१० <u>बीजभांडवल कर्जाची परतफेड करण्याचा कालावधीः-</u> बीजभांडवल कर्जाच्या परतफेडीचा कालावधी एकूण ७ वर्षाचा असून त्यामध्ये सुरुवातीला तीन वर्षाचा विलंबावधी समाविष्ट राहील. म्हणजेच बीजभांडवल मिळाल्यापासून तीन वर्षानंतर परतफेड सुरु होईल व ती ७ वर्षामध्ये पूर्ण होईल. विलंबावधीतील संचित व्याजाची रक्कम विलंबावधीनंतर एकरकमी वसूल केली जाईल. उर्वरित चार वर्षाच्या कालावधीमध्ये मुद्दल व व्याजाची रक्कम वार्षिक हप्त्यामध्ये वसूल केली जाईल.

१.११ <u>कार्यपद्धतीः</u>- जिल्हा उद्योग केंद्रानी संभाव्य लाभार्थीना मेळावे, बैठका, चर्चासत्र, प्रशिक्षण याद्वारे स्वयंरोजगारासाठी प्रवृत्त करावे. या योजनेचा लाभ घेऊ इच्छिणा-यांनी विहित नमुन्यात कर्जासाठी जिल्हा उद्योग केंद्राकडे अर्ज करावा. असा अर्ज कार्यपथकाकडून [टास्कफोर्स कमिटी] शिफारस झाल्यानंतर बँकेकडे पाठविला जाईल. बँकेने मंजूर केलेल्या प्रकरणातील बीजभांडवल - जिल्हा उद्योग केंद्राकडून बँकेमार्फत लाभार्थीना वितरित करण्यात येईल. त्यामुळे लाभार्थीनिहाय लेखे ठेवण्याचे व त्याची वसुली करण्याचे सर्व काम जिल्हा उद्योग केंद्राकडून केले जाईल.

१.१२ बीजभांडवल कर्जाचा गैरवापर झाल्यास किंवा परतफेडीला विलंब झाल्यास करावयाची कारवाईः-

१.१२.१ लाभार्थीनी बीजभांडवल कर्जाचा गैरवापर केला किंवा चुकीची माहिती पुरवून योजनेचा लाभ घेतल्याचे तसेच योजनेच्या अटी व शर्तीचा भंग केल्याचे आढळल्यास सदर बीजभांडवलाची रक्कम एक रकमी वसूल करण्यात यावी व त्यावर दरसाल दर शेकडा २४ टक्के दराने व्याज आकारण्यात यावे.

१.१२.२ तसेच बीजभांडवल कर्जाच्या रकमेची विहित कालमर्यादेत परतफेड करण्यात आली नाही तर थकलेल्या रकमेवरसुद्धा द.सा.द.शे. २४ टक्के दराने व्याज आकारण्यात यावे.

१.१२.३ नियमित पद्धतीने बीजभांडवल कर्ज व त्यावरील व्याजाची वसुली करणे शक्य नसल्यास थकीत रकमेची वसुली “महसूल थकबाकी” म्हणून वसूल करण्यात यावी.

२. वर नमुद केलेली सुधारित योजना दि. १ ऑक्टोबर ,१९९३ पासून अंमलात येईल. ज्या व्यक्तींना विभागीय विकास महामंडळाकडून बीजभांडवल देण्यात आलेले असेल , त्या सर्व प्रकरणी बीजभांडवल कर्ज व त्यावरील व्याज

वसूल करण्याची कार्यवाही संबंधित विभागीय विकास महामंडळनेच करावयाची आहे.

३. बीजभांडवल वितरण करताना शासन मान्य कौशल्यावर आधारित अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या बेरोजगारांना प्राधान्य देण्यासंबंधीचे जे आदेश शासन निर्णय उद्योग, उर्जा व कामगार विभाग, क्र.इपीपी १०९२/६३६४/उद्योग-१८, दि. १९ आगस्ट १९९२ अन्वये प्रसृत करण्यात आलेले आहेत. ती मार्गदर्शक तत्वे या सुधारित योजनेला लागू राहतील.

४. हा शासन निर्णय, नियोजन विभाग व वित्त विभागाच्या सहमतीने, वित्त विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्र. प्र.क्र. ६२७/व्यय-१६, दि.४.७.९२ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे,

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

सही/-
(र.बा. उपाध्ये)
शासनाचे उप सचिव